


सायं दैनिक
# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ३१ • शनिवार दि.२४ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## नांदेडात शेतकऱ्याची आत्महत्या

### दहा हजारांच्या वसुलीसाठी 'फायनान्स'ने डांबून मारहाण केल्याचा आरोप

नांदेड/प्रतिनिधी-कर्जवसुलीच्या तगाद्यातून शेतकऱ्यांचा छळ होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत असतानाच नांदेडमध्ये एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. खासगी फायनान्स कंपनीच्या कार्यालयात ४० वर्षीय अल्पभूधारक शेतकरी चंद्रकांत शिंदे (रा. माळकौठा, ता. मुदखेड) यांचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. कर्जवसुलीसाठी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना गावातून नांदेड येथील कार्यालयात आणल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या घटनेमुळे शेतकरी वर्गात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, शेतकऱ्याच्या मृत्यूमागील नेमके कारण काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, नांदेड शहरातील हिंगोली गेट ते चिखलवाडी बायपास मार्गावरील एका खासगी फायनान्स कंपनीच्या कार्यालयात ही घटना घडली. चंद्रकांत शिंदे यांनी संबंधित फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतले होते. कर्जाचे हप्ते थकल्याने दोन दिवसांपूर्वी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना त्यांच्या माळकौठा येथील गावातून नांदेडमधील कार्यालयात आणल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.कर्जाच्या वसुलीसाठी त्यांच्यावर दबाव टाकण्यात आला होता का, त्यांना कार्यालयात कोणत्या परिस्थितीत ठेवण्यात आले होते आणि या काळात नेमके काय घडले, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, कार्यालयातच त्यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्याने या घटनेचे गांभीर्य वाढले आहे.चंद्रकांत शिंदे यांच्या मृत्यूची माहिती मिळताच कुटुंबीय आणि ग्रामस्थांना मोठा धक्का बसला. कर्जवसुलीसाठी त्यांना गावातून कार्यालयात आणण्यात आले होते, तसेच त्यांच्यावर मानसिक दबाव टाकण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या कथित दबावाचा त्यांच्या मृत्यूशी काही संबंध आहे का, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.मात्र, शेतकऱ्याचा मृत्यू नेमक्या कोणत्या परिस्थितीत झाला, याबाबत अद्याप अधिकृत निष्कर्ष **पान ४ वर**

## टायगर श्रॉफवरील गोळीबारानंतर बॉलिवूडचा मुंबई सोडण्याचा इशारा!

मुंबई/प्रतिनिधी-अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर बॉलिवूड मधील कलाकारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ऑल इंडियन सिने वर्कर्स असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश गुप्ता यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून तातडीने ठोस सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. सुरक्षा व्यवस्था सुधारली नाही, तर संपूर्ण चित्रपटसृष्टी मुंबईबाहेर





हलविण्याचा निर्णय घ्यावा लागू शकतो, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

कलाकारांना गुन्हेगारी टोळ्यांकडून धमक्या मिळत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. टायगर श्रॉफवरील गोळीबाराची राष्ट्रीय तपास यंत्रणेमार्फत चौकशी करावी, त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना सुरक्षा द्यावी, तसेच कलाकार व चित्रपट कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र केंद्रीय कृती **पान ४ वर**

## मराठवाडा,विदर्भासह राज्यात दोन दिवस पावसाचा अंदाज

मुंबई/प्रतिनिधी-बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे महाराष्ट्रात पावसाची शक्यता व्यक्त केली जात आहे. २७ ते २९ ऑक्टोबर दरम्यान मराठवाडा, विदर्भासह राज्याच्या काही भागांत पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मात्र, हवामान विभागाच्या उपलब्ध जिल्हानिहाय अंदाजानुसार या कालावधीत राज्यात व्यापक पावसाची अद्याप निश्चित शक्यता नाही.

राज्यात पावसाअभावी खरीप हंगामाला मोठा फटका बसला असून, रब्बी हंगाम आणि पिण्याच्या पाण्याची चिंता वाढली आहे. पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकरी चिंतेत आहेत. खरीप पिकांचे नुकसान झाल्यानंतर आता रब्बीच्या पेरण्यांसाठी जमिनीत पुरेसा ओलावा मिळण्याची प्रतीक्षा सुरू आहे. बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे क्षेत्र अधिक तीव्र झाल्यास हवामानात बदल होऊ शकतो. मात्र, या प्रणालीची दिशा आणि तीव्रता यावर महाराष्ट्रातील पावसाचे प्रमाण अवलंबून राहणार आहे. मराठवाडा आणि विदर्भात पाऊस झाल्यास रब्बीच्या पेरण्यांना काही प्रमाणात मदत होऊ शकते. तसेच जमिनीतील ओलावा वाढण्यास हातभार लागू शकतो. मात्र, राज्यातील पाणीटंचाई दूर होण्यासाठी पुरेसा आणि व्यापक पाऊस आवश्यक **पान ४ वर**

## तस्करांकडून गाईला बेशुद्धीचे इंजेक्शन; इनोव्हातून तस्करीचा डाव सतर्क नागरिकाने उधळला

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद शहरात मध्यरात्रीच्या सुमारास अत्यंत धक्कादायक आणि थरारक प्रकार समोर आला आहे. रस्त्यावरील गाईला थेट बेशुद्धीचे इंजेक्शन देऊन, तिला चक्क 'इनोव्हा' गाडीत टाकून पसार होण्याच्या प्रयत्नातील टोळीचा धाडसी डाव एका सतर्क नागरिकाच्या सतर्कतेमुळे फसला आहे.२३ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री ३ वाजता बन्नाळी चौक परिसरातील नगरसेवक ताहेर पठाण यांच्या घरासमोर हा प्रकार घडला असून, या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

पांढऱ्या रंगाच्या हायस्पीड इनोव्हा गाडीतून आलेल्या अज्ञात तस्करांनी रस्त्यावरील एका निष्पाप गाईला बेशुद्धीचे इंजेक्शन टोचले. भर रस्त्यात थरार इंजेक्शनचा विळखा पडताच गाय निपचित पडली. चोरटे अत्यंत सराईतपणे गाईला उचलून इनोव्हा गाडीच्या मागच्या सीटवर कोंबण्याचा प्रयत्न करत होते. मध्यरात्री ३ वाजता परिसरातील एका नागरिकाला संशयास्पद हालचाली दिसल्या. त्याने जवळ जाऊन पाहिले असता तस्करांचा अंगावर काटा आणणारा हा प्रकार उघड झाला.नागरिकाने कसलीही भीती न बाळगता जीव धोक्यात घालून थेट जागेवरच मोठा आरडाओरडा सुरू केला. पकडले जाण्याच्या भीतीने तस्करांचे धाबे दणाणले. नागरिकाच्या आवाजाने संपूर्ण परिसर जागा होत असल्याचे पाहून चोरट्यांनी गाईला तिथेच रस्त्यावर फेकले आणि इनोव्हा गाडीचा स्पीड वाढवून अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाले. महागड्या चारचाकी गाड्यांचा वापर करून मुक्या प्राण्यांना थेट इंजेक्शन देऊन होणाऱ्या या हायटेक चोरीच्या प्रकारामुळे धर्माबादमधील पशुपालक आणि नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे. हे तस्कर नेमके कुठले आहेत? त्यांच्याकडे ही इंजेक्शन कुठून आली? याचा तपास आता सुरू आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी कसून तपास सुरू केला असून, अशा संशयास्पद गाड्या किंवा रात्रीच्या वेळी फिरणारे अज्ञात इसम आढळल्यास तात्काळ धर्माबाद पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## ऑडिओ क्लिपवरुन राजकारण तापले; जरांगेंचा जीवाला धोका असल्याचा दावा

### ती रक्कम नेमकी कुठे-श्रीकांत शिंदेंची प्रतिक्रिया;चौकशीचे मुख्यमंत्री फडणवीसांचे आदेश

मुंबई/प्रतिनिधी-मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहारा संदर्भातील ध्वनिचित्रफीत प्रसारित केल्याच्या दाव्यामुळे राज्याच्या राजकारणात वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत. भाजपने एकनाथ शिंदे यांना जरांगेंना हाताळण्यासाठी ५०० कोटी रुपये दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचे वृत्त आहे.

खा.श्रीकांत शिंदे यांनी या आरोपांवर मिश्किल प्रतिक्रिया देताना, ते ५०० कोटी रुपये माझ्यापर्यंत पोहोचलेच नाहीत. पैसे कोणी घेतले, याचा शोध मीही घेत आहे, असे म्हटले. संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन सत्य समोर आले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणातून मराठा आंदोलन बदनाम करण्याचा आणि समर्थकांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप जरांगे-पाटील यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संबंधित व्यक्तींकडून आपल्या जीवाला धोका असल्याचा दावा करत, घरावर केव्हाही हल्ला होऊ शकतो, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. सरकारने आपली सुरक्षा काढून घेतल्याचा आरोपही त्यांनी केला.कथित ध्वनिचित्रफीत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने तयार केल्याचा आरोप भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी केल्याचे वृत्त आहे. हा आरोप जरांगे यांनी फेटाळला असून, क्लिप प्रसारित होण्यामागील स्रोताची चौकशी करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, या ध्वनिचित्रफितीची सत्यता आणि त्यातील आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. चौकशीअंतीच या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

## सागवान तस्करीचा पर्दाफाश;पाच जण पसार,सागवान जप्त

किनवट/प्रतिनिधी-किनवट वन विभागाच्या फिरत्या पथकाने रात्रीच्या गुप्त गस्तीदरम्यान मोठी कारवाई करत सागाच्या लाकडाची तस्करी उघडकीस आणली. २४ ऑक्टोबर रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास किनवट सिरमेटी रोडवर डोक्यावरून सागाचे लाकूड घेऊन जाणाऱ्या ५ अनोळखी इसमांवर वनविभागाने कारवाई केली. आरोपी मात्र अंधाराचा गैरफायदा घेऊन पसार झाल्याचे सूत्रांनी सांगितले.



पहाटेच्या सुमारास सिरमेटी रोडवर फिरते पथक गस्त घालत असताना ५ जण डोक्यावर सागी नग घेऊन किनवटच्या दिशेने येताना दिसले. गस्ती पथकाने त्यांना तत्काळ पकडण्याचा प्रयत्न केला, परंतु अंधाराचा फायदा घेऊन आरोपी लाकडं फेकून पळून गेले. या कारवाईदरम्यान वनविभागाने प्र.गु.री. क्र. २२/२०२६ अन्वये ४,४१८ रुपये मूल्याचे ०.२०९३ घनमीटरचे ५ सागी नग जप्त केले आहेत. सदर कारवाई नांदेडच्या उपवनसंरक्षक मनीषा पाटील, सहाय्यक वनसंरक्षक किरण चव्हाण आणि किनवटचे वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा) धीरज मदने यांच्या **पान ४ वर**

## राजकीय हाणामारीत १८ तासांनंतरही गुन्ह्याची नोंद नाही

### दोघांची प्रकृती गंभीर;पोलीस यंत्रणेवर प्रश्नचिन्ह,कायम बंदोबस्ताची मागणी

किनवट/प्रतिनिधी-गोकुंदा येथील प्रमुख चौक हे हाणामारीचे केंद्रबिंदू ठरु लागले आहे.२३ ऑक्टोबर रोजी रात्री संदीप केंद्रे यांच्या कार्यालयात जाऊन एका टोळक्याने चाकू व दगडी हल्ला केला. तर बचाव भूमिकेवेळी किनवट येथील लहू चिमणाजी मेटकर यांच्यावरही हल्ला केल्याने तोही गंभीर जखमी झालाय. जखमींवर उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून एकाला नांदेड तर दुसऱ्याला आदिलाबादकडे पुढील उपचारासाठी पाठवल्याचे सूत्रांनी सांगितले. २२ ऑक्टोबर रोजी रात्री दुर्गादेवी विसर्जन मिरवणुकी दरम्यान यांच्यातच हाणामारीची ठिणगी पडली. त्याच दिवशी पोलीस प्रशासनाने स्वत:हून प्रकरणाला सहज न घेता गंभीर दखल घेतली असती तर कदाचित हा प्राणघातक हल्ला टळला असता, अशा लोकप्रतिक्रीया ऐकायला मिळताहेत.

२३ ऑक्टोबर रोजी रात्री संदीप केंद्रे हे गोकुंदा येथील मुख्य चौकातील त्यांच्या कार्यालयात बसले होते. रात्री ८:३० चे दरम्यान अचानक एका टोळक्याने कार्यालयात घुसून केंद्रेंवर सशस्त्र हल्ला केला. हल्लेखोरांपैकी दोघांच्या हातात चाकू तर इतरांकडे दगड होते. तुला मारून टाकायचे आहे, अशी भाषा





वापरत हल्लेखोरांनी त्यांच्यावर हल्ला चढवल्याचे सांगितले. या हल्ल्यात संदीप केंद्रे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून हाताच्या बोटाला मार लागलाय. याचवेळी किनवट शहरातील गंगानगर येथील लहू चिमणाजी मेटकर याच्यावरही प्राणघातक हल्ला झाला असून त्याच्या पायाला, खांद्याला, डोक्यात आणि पाठीवर गंभीर जखमा झाल्याचे सांगितले. दोन्ही जखमींना गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉ.आदित्य बदने यांनी प्राथमिक उपचार करुन लहू मेटकर यास आदिलाबादकडे तर संदीप केंद्रे यांना पुढील उपचारासाठी नांदेडकडे पाठविण्यात आले. गोकुंदा शहरात तुर्तास तरी तणावपूर्ण शांतता आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांनी जखमी संदीप केंद्रे यांची भेट घेऊन विचारपूस केली. पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांनी रात्री बाहेरच्या पोलीस ठाण्यातील फोर्स मागवला. दरम्यान, किनवट मधील सुंदर हॉस्पिटलवरही दगडफेक करून काचा फोडल्या तर गोकुंद्यातील एका खाजगी कार्यालयावर दगडफेक झाल्याचे वृत्त आहे. गोकुंदा येथील प्राणघातक हल्ला प्रकरणाला आज (२४ ऑक्टोबर) १८ तास ओलांडली तरीसुद्धा किनवट पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झालेली नाही. जखमींचे जबाब घेण्यासाठी पोलीसांना पाठवले असून ते प्राप्त होताच प्रक्रिया पूर्ण केली जाईल असे पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. २३ ऑक्टोबर रोजी रात्री ८:३० वाजता गोकुंदा येथील मुख्य चौकात हल्ला प्रकरण घडले होते.

**अपर पोलीस अधीक्षकांनी पत्रकारांशी बोलणे टाळले**

गोकुंदा येथील प्राणघातक हल्ला प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आज (२४ ऑक्टोबर) भोकरच्या अपर पोलीस अधीक्षकांनी किनवटला भेट देऊन आढावा घेतला. दरम्यान किनवटच्या काही प्रमुख पत्रकारांच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन परिस्थितीजन्य विषयक चर्चा करून गोकुंदा येथील त्या संवेदनशील चौकात कायमचा पोलीस बंदोबस्त वाढविण्यात यावा यासाठी भेट घेण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनी भेट टाळली हे विशेष. पोलीस बळ कमी असल्याच्या सबबीखाली नेहमीच वेळ मारुन नेली जाते. गोकुंद्यात **पान ४ वर**

# मतदानाचा टक्का वाढला; अपेक्षांचे काय?

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीत मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली असून आता सर्वांचे लक्ष २७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे. राज्यातील तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांसाठी झालेल्या या निवडणुकीत एकूण मतदान सुमारे ७२ टक्के नोंदविण्यात आले. अमरावती शिक्षक मतदारसंघात सुमारे ९१ टक्के, पुणे शिक्षक मतदारसंघात ८५.८७ टक्के, नागपूर पदवीधर मतदारसंघात सुमारे ६४ टक्के, पुणे पदवीधर मतदारसंघात ६२.७८ टक्के, तर छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात सुमारे ५८ टक्के मतदान झाले. मराठवाडा विभाग पदवीधर मतदारसंघात सुमारे ५८ टक्के मतदान नोंदविले गेले. या आकडेवारीतून शिक्षक आणि पदवीधर मतदारांच्या सहभागातील फरक प्रकर्षाने समोर आला आहे. पाच मतदारसंघांतील १८२ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे. महायुती आणि महाविकास आघाडीसह विविध पक्षांच्या उमेदवारांनी निवडणुकीत आपापली ताकद पणाला लावली. काही मतदारसंघांमध्ये बंडखोरी आणि बहुरंगी लढतींमुळे राजकीय समीकरणे गुंतागुंतीची झाली आहेत. त्यामुळे मतदानाच्या टक्केवारीवरून कोण विजयी होणार, याचे निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. मतदारांनी कोणाला पसंती दिली, हे मतमोजणीनंतरच स्पष्ट होईल. मात्र, या निवडणुकीने उपस्थित केलेले प्रश्न निकालानंतरही महत्त्वाचे राहणार आहेत. शिक्षक मतदारसंघांमध्ये मतदानाची टक्केवारी अधिक असताना पदवीधर मतदारसंघांमध्ये तुलनेने कमी मतदान झाले. या फरकाचा विचार करताना दोन्ही मतदारगटांची परिस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. शिक्षक संघटनांचे जाळे, सहकाऱ्यांमधील संपर्क आणि व्यावसायिक प्रश्नांबाबतची जागरूकता यांचा मतदानावर परिणाम होऊ शकतो. मात्र, केवळ या घटकांवरूनच मतदानातील फरकाचे स्पष्टीकरण देता येणार नाही. पदवीधर मतदारसंघातील कमी सहभाग हा चिंतनाचा विषय आहे. विशेषतः मराठवाडा विभाग पदवीधर मतदारसंघात सुमारे ५८ टक्के मतदान होणे ही बाब सुशिक्षित मतदारांच्या सहभागाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करते. पदवी मिळविल्यानंतर रोजगाराच्या संधी, बेरोजगारी, स्पर्धा परीक्षांमधील अनियमितता, सरकारी भरतीतील विलंब आणि खासगी क्षेत्रातील अस्थिरता अशा अनेक प्रश्नांना तरुणांना सामोरे जावे लागते. या प्रश्नांवर विधिमंडळात आवाज उठविणारा प्रतिनिधी निवडण्याची संधी त्यांना मिळते. असे असताना मतदानात अपेक्षित सहभाग का दिसत नाही, याचा राजकीय पक्षांनी आणि निवडणूक यंत्रणेने गांभीर्याने विचार केला पाहिजे. सुशिक्षित मतदारांनी मतदानात शंभर टक्के सहभाग नोंदविणे ही लोकशाहीची अपेक्षा आहे. शिक्षणामुळे नागरिकांना आपल्या मताचे महत्त्व, सार्वजनिक धोरणांचा परिणाम आणि लोकप्रतिनिधींच्या जबाबदाऱ्या अधिक चांगल्या प्रकारे समजतात. त्यामुळे पदवीधर मतदारांनी मतदानापासून दूर राहणे ही केवळ वैयक्तिक उदासीनता नसून लोकशाही प्रक्रियेतील एक महत्त्वाची उणीव ठरते. मतदानाचा अधिकार हा हक्क असला, तरी तो जबाबदारीने वापरणे हे सुशिक्षित समाजाचे कर्तव्य आहे. मतदार यादीत नाव नोंदविण्यापासून मतदानाच्या दिवशी केंद्रापर्यंत पोहोचण्यापर्यंतच्या प्रक्रियेत काही अडचणी असू शकतात. निवडणुकीबाबतची अपुरी माहिती, उमेदवारांच्या कामगिरीविषयीचा अभाव आणि राजकीय व्यवस्थेबद्दलची निराशा ही देखील संभाव्य कारणे असू शकतात. मात्र, त्यांची वस्तुस्थिती तपासल्याशिवाय कोणत्याही एका कारणाला जबाबदार धरणे योग्य ठरणार नाही. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ हे केवळ राजकीय पक्षांच्या प्रतिष्ठेचे मैदान बनता कामा नयेत. शिक्षणव्यवस्थेतील त्रुटी, शिक्षकांची रिक्त पदे, वेतनविषयक प्रश्न, शिक्षण संस्थांमधील समस्या, रोजगारनिर्मिती आणि तरुणांच्या भविष्याशी संबंधित मुद्द्यांवर या मतदारसंघांतील प्रतिनिधींनी सातत्याने काम करणे अपेक्षित आहे. निवडणुकीच्या काळात मतदारांशी संपर्क साधणे, आश्वासने देणे आणि विजयासाठी प्रचार करणे हे राजकीय प्रक्रियेचे भाग आहेत. परंतु निवडून आल्यानंतर मतदारांच्या प्रश्नांकडे पाठ फिरविली, तर मतदानाच्या दिवशी व्यक्त झालेल्या विश्वासाला अर्थ उरणार नाही. उमेदवारांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, कामाचा ठोस कार्यक्रम मांडावा आणि निवडून आल्यानंतर केलेल्या कामाचा हिशेब जनतेसमोर ठेवावा. मतदानाचा वाढलेला टक्का हा लोकशाहीतील सहभागाचा सकारात्मक संकेत असू शकतो; परंतु त्यावरून कोणत्या पक्षाला फायदा झाला, हे ठरविता येत नाही. अधिक मतदान म्हणजे सत्ताधाऱ्यां विरोधातील कौल किंवा विरोधकांच्या बाजूने निर्माण झालेली लाट, असे निष्कर्ष काढणेही योग्य नाही. मतदारांचा अंतिम कौल मतमोजणीनंतरच समजेल. लोकशाहीत मतदान करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच निवडून आलेल्या प्रतिनिधींना त्यांच्या कामाचा जाब विचारणेही आवश्यक आहे. शिक्षकांचा असो वा पदवीधरांचा, प्रत्येक मतामागे काही अपेक्षा आणि प्रश्न असतात. त्या अपेक्षांची पूर्तता करणे ही प्रतिनिधींची जबाबदारी आहे. मतदानाची टक्केवारी चर्चेचा विषय ठरेल; राजकीय पक्ष विजयाचे दावे करतील आणि निकालानंतर यशाचे श्रेय घेतील. पण या सगळ्यापलीकडे एकच कसोटी महत्त्वाची ठरते, मतदारांच्या प्रश्नांचे निराकरण किती झाले? मतपेटीतून व्यक्त झालेला कौल हा केवळ विजय-पराजयाचा आकडा नसतो. तो लोकप्रतिनिधींवर सोपविलेला विश्वास असतो. हा विश्वास टिकविणे आणि त्याला कामाची जोड देणे, हीच या निवडणुकीतील खरी परीक्षा आहे.

# चिंतन..!! निवडणूक आयोग व सर्वोच्च न्यायालयाची निष्पक्षता..!! काही प्रश्न..!!

आज देशभरात निवडणूक आयोग व न्यायपालीका यांच्या निष्पक्षेते वर प्रश्न चिन्ह निर्माण झाले असुन त्यांच्या विरोधात देशभरात आंदोलन सुरू झाले आहे.देशातील जवळपास सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन राजधानी दिल्लीत व इतर ठिकाणी आंदोलन करत आहेत.तर दुसऱ्या बाजूला सत्ताधारी पक्ष अर्थात सरकार त्यांना संरक्षण देत आहे.हे सत्य नाकारता येत नाही.आंदोलन चिरडून टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बळाचा वापर केला जात आहे..!! अशी भावना सर्व सामान्य नागरिक व्यक्त करताना दिसत आहेत.एवढेच नाही तर राजधानी दिल्लीत आणिबाणी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीला कोण जबाबदार आहे? सरकार, विरोधी पक्ष,सर्वोच्च न्यायालय यांच्या भुमिकेचा तटस्थपणे विचार करायला हवा असे या देशाचा एक नागरिक म्हणून मला वाटते.मलाच नव्हे देशभरातील अनेक नागरिकांना वाटते असे माझे निरिक्षण आहे.



मी या बाबतीत जे चिंतन केले आहे ते सर्वांच्या समोर यावे यावर जाहीर चर्चा व्हावी.कारण निवडणूक आयोग व सर्वोच्च न्यायालय या देशाच्या लोकशाहीचे मुख्य आधारस्तंभ आहेत.जर हेच निष्पक्ष नसतील तर ही बाब अत्यंत गंभीर आहे.भारतीय लोकशाहीसाठी ही तर धोक्याची घटांच आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.या बाबतचे वास्तव जन आंदोलनाच्या चळवळीतील एक कार्यकर्ता व एक नागरिक म्हणून मी समजून घेण्याचा प्रयत्न माझ्या परीने केला आहे.तेच अंतिम सत्य आहे असा माझा दावा नाही म्हणून त्यावर साधक बाधक चर्चा व्हावी व सत्य लोकांच्या समोर यावे व आपली जगातील सर्वात मोठी असलेली लोकशाही व संविधान मजबूत व्हावे असे मला वाटते. म्हणून हा लेखन प्रपंच..!!

हे सगळे समजून घ्यायचे असेल तर आपल्याला मागे जाऊन २०१४ ला देशात मोदीजीच्या नेतृत्वात जेव्हा भाजप व त्यांच्या मित्र पक्षाचे सरकार सत्तेत आले तेव्हा पासूनचा मागोवा घेणे क्रमप्राप्त आहे.खरे तर एन.डी.ए.चे सरकार जेव्हा केंद्रात सत्तेवर आले तेव्हा या देशातील जनतेने कांग्रेस व त्यांच्या मित्र पक्षाच्या भ्रष्ट कारभाराच्या व घराणेशाहीच्या विरोधात दिलेला तो स्पष्ट जनादेश होता.असे माझे मत आहे.पण पुढे जावुन एन.डी.ए.आघाडीला अर्थात मोदी सरकारला याचा विसर पडला असे वाटते.त्यानी निवडणूकीत भारतीय जनतेला जी पारदर्शक कारभाराची ग्वाही त्यानी दिली होती नेमके त्याच्या उलट कृती केली.हे नाकारता येणार नाही या देशातील लोकशाही संपुष्टात आणण्यासाठी त्यांनी संविधानावरच आघात केला आहे असे मला वाटते.!

हे काम एकट्या भाजपचे नाही तर सरकार मधे जे त्यांचे मित्र पक्ष आहेत ते पण यात सहभागी आहेत. सोबतच प्रसार माध्यमाची ही कमी आधीक प्रमाणात भागीदारी आहे हे नाकारता येत नाही.अशा अवस्थेत सर्व सामान्य माणसाच्या मनात जे प्रश्न निर्माण झाले आहेत त्याची कारणमीमांसा अर्थात चिकित्सा करणे गरजेचे आहे हे पण तेवढेच खरे.! कारण भाजप हा २०१४ पासून कधीच बहुमताने विजयी झाला नाही. म्हणून त्यानी इतर प्रादेशिक पक्षांना सोबत घेतले व आघाडीचे राजकारण केले. त्यांच्या बळावर सत्ता स्थापन केली परंतू हे करत असताना सर्वात मोठा पक्ष म्हणून त्यांनी मित्र पक्षांना विश्वासात घेतले की नाही या बाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असले तरी हे मान्य करावे लागते.की भाजपाने आपले उद्दिष्ट.धेय्य. भुमिका सुरवाती पासूनच कधीच लपवून ठेवलेली नाही..!!

त्यांचे भारताला हिंदूराष्ट्र बनवण्याचे ध्येय होते त्या साठी त्यांना संसदेत पुर्ण नाही तर दोन तृतीयांश बहुमत हवे होते पण ते मिळवण्यात त्यांना आज पर्यंत तरी येश आले नाही. हे आधी समजून घेतले तर पुढचा घटनाक्रम समजुन घेणे सोपे जाईल.! या दशकभरात भाजपाने आपल्या प्रादेशिक मित्र पक्षाच्या मदतीने सत्ता ताब्यात तर ठेवलीच.पण ते मोठे होणार नाहीत याची काळजी घेतली.त्यांचा हेतू साध्य झाला की काहींना बाहेरचा रस्ता दाखवला तर काही मित्र पक्षात फूट पाडली त्या साठी त्यांना जे जे करणे शक्य होते ते ते त्यांनी केले.केंद्रातील तपास यंत्रणा, राज्यपाल, सभापती व भारतीय संविधानाने ज्या संस्थांना स्वायततेचा दर्जा दिला आहे त्यांना ही वेगवेगळ्या युक्त्या वापरून आपल्या बाजूला करून घेतले.त्यांचा वापर करून मनमानी पद्धतीने आपला हेतू साध्य करण्याचा प्रयत्न केला.वेग वेगळे कायदे संसदेत मंजूर करून घेतले.त्यात निवडणूक आयोग ही आला.हे वास्तव नाकारता येत नाही..!! मग हे करण्यासाठी त्यांनी अनेक प्रादेशिक पक्षात फुट पाडली.

**सुनील खंडाळिकर**
अहमदपूर जि.लातूर

ती कायद्याच्या चौकटीत बसणारी नाही असे विरोधकांचे म्हणणे आहे.त्यासाठी त्यांनी आवाज ऊठवला न्यायालयात धाव घेतली पण न्यायालयात अजुनही त्याचा निकाल लागला नाही.तारखावर तारखा असेच आजही चालू आहे.

सुप्रीम कोर्टातील जेष्ठ विधिज्ञ, कायदेतज्ज्ञ व राज्यसभा सदस्य अँड कपील सिबल यांनी माझा न्याय संस्थेवरील विश्वास ऊडत चालला आहे असे जाहीर वक्तव्य करून खरे तर खळबळ उडवून दिली.! त्यांच्या या वक्तव्यामुळे न्याय व्यवस्थेबद्दल देशभरात सर्वसामान्यांच्या मनात न्यायालयाच्या कार्यपद्धती बदल शंका निर्माण झाली ही बाब भारतीय लोकशाहीसाठी चिंताजनक म्हणावी लागेल.कपील सिब्बल यांच्यासारखा जेष्ठ कायदेतज्ञ जेव्हा असे वक्तव्य करतो तेव्हा त्याच्या पाठिमागचे वास्तव समजून घेणे आवश्यक असले तरी विषयांतर होणार नाही याची काळजी घेत त्यावर या लेखात चर्चा करत करणे संयुक्तिक नाही. एन.डी.ए सरकारने निवडणूक आयोगाच्या संदर्भात राज्यघटनेत जी मुळ तरतुद डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केली होती. ती बदलुन आपल्याला सोयीस्कर अशी कायदेशीर तरतूद करून घेतली त्या साठी संविधानात बदल केला. हे वास्तव आहे.त्यासाठी मुळ तरतूद व केलेला बदल हे काय आहेत हे समजून घेणे महत्त्वाचे आहे..!!

माझ्या माहितीप्रमाणे भारतीय संविधानात निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीची जी तरतूद घटनाकारांनी केली होती त्यात देशाचे पंतप्रधान,लोकसभेचा विरोधीपक्ष नेता व सर्वोच्य न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांनी सहमतीने निवडणूक आयुक्तांची नेमणूक करायला हवी जर सहमती नाही झाली तर बहुमताने निवडणूक आयुक्ताची निवड व्हायला हवी अशी होती परंतु या सरकारच्या काळात या कायद्यात बदल केला गेला.व सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्यन्यायाधीशानाच यातुन वगळले गेले.व त्यांच्या ऐवजी केंद्र सरकार मधील एका जेष्ठ मंत्र्याचा यात समावेश करण्यात आला.हे वास्तव समजून घेतले पाहिजे.सरकार एवढ्या वरच थांबले नाही तर त्यांनी आणखी एक कायदा केला व त्यात निवडणूक आयुक्तावर ते हयात असे पर्यंत त्यांच्या वर गुन्हा दाखल करता येणार नाही.आसा कायदा करून सरकारने निवडणूक आयुक्तांच्या मनमानी पद्धतीच्या कारभाराला एक प्रकारे संरक्षण दिले आहे.असे म्हणले तर ते चुकीचे ठरणार नाही.! या मुळे सर्वसामान्य नागरिकांच्या मनात जो प्रश्न निर्माण झाला आहे की हे असे करण्याची सरकारला गरज का वाटली?या प्रश्नाचे उत्तर सापडत तर नाहीच उलट या मुळे सरकारची नियत साफ दिसत नाही असेच वाटते.एवढेच नाही तर त्यांना एकुण निवडणूक प्रक्रिया ताब्यात घेऊन लोकशाहीचे एकाधिकारशाहीत रुपांतर तर करायचे नाही ना ? अशी शंका येते.!

सरकारने आज जो मतदार याद्या दुरुस्तीच्या नावावर एस.आय.आर.च्या नावाखाली गोंधळ घातला त्या वरुन या शंकेला पुष्टी मीळते.असेच म्हणावे लागेल.! एस.आय.आर.च्या बाबतीत तर निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला ही या प्रकरणात ओढले व एस.आय.आर.मधे जे बदल केले गेले ते मान्ननिय सर्वोच्च्य न्यायालयाच्या परवानगीने केले असा दावा निवडणूक आयोगाने केल्यावर मात्र देशभरात संतापाची लाट उसळली.व सर्वोच्चय न्यायालयाला याच्याशी आमचा काहीच संबंध नाही म्हणून खुलासा करावा लागला..! निवडणूक आयोगाचा खोटारडेपणा उघड झाला.पण भारतीय इतिहासात पहिल्यांदाच अशी घटना घडली असावी.एवढे होऊनही सर्वोच्च न्यायालयाने मात्र या बाबत फक्त खूलासाच केला.निवडणुक आयोगावर कुठलीही कारवाई केली नाही.हे ही वास्तव नाकारता येत नाही..!!

दुसरे उदाहरण म्हणून पाहायचे असेल तर या पुर्वी ही निवडणूक आयोगाच्या विरोधात पक्षांतरबंदी व पक्ष चिन्हाच्या संदर्भात ज्या याचीका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत त्यावर चार पाच वर्षे झाली तरी आजुन ही निकाल दिला नाही.तसेच सरकारने मुख्य न्यायाधिषाना निवडणूक आयोगाच्या नियुक्ती करण्याच्या अधिकार कक्षेतून हटवले तरी त्यावर सर्वोच्च न्यायालयाने काही ही भाष्य केले नाही.यामुळे सर्वोच्च न्यायालय ही खरे पाहता संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे.तसा आरोप विरोधीपक्ष करत आहेत.हे सर्व पाहून एकुणच सर्वोच्च न्यायालय व निवडणूक आयोगाच्या विश्वासहर्तेबदल प्रश्नचिन्हं निर्माण झाले आहे.हे मान्य करावे लागेल..!! या वरुन खरोखरच या देशातील लोकशाही व संविधान धोक्यात आले आहे की काय अशी शंका सर्वसामान्य नागरिकांनी व्यक्त केली तर त्यात चूक काय.? आज देशभरात या सर्वावरून आंदोलन सुरू असताना सत्ताधारी व विरोधी पक्ष एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत.त्यावर चर्चा झाली पाहिजे.सत्य जनतेच्या समोर आले पाहिजे.

प्रश्नांची उत्तरे सर्व सामान्य जनतेला मिळाली पाहिजेत असे मला एक नागरिक व जन आंदोलनाच्या चळवळीतील कार्यकर्ता म्हणून वाटते या वर साधक बाधक चर्चा होऊन जनतेच्या मनात ज्या शंका निर्माण झाल्या आहेत त्या मागचे सत्य समोर यायला हवे व सर्व शंकांचे निराकरण व्हावे व भविष्यात भारतीय लोकशाही व संविधान मजबूत व्हावे यासाठी निवडणूक आयोगाच्या संदर्भात सरकारने केलेले दोन्ही कायदे रद्द करून पुर्वी प्रमाणेच निवडणूक आयुक्ताची नेमणूक केली जात नाही तो पर्यंत निवडणूक आयोगाच्या निष्पक्षपते वर जनता विश्वास ठेवणार नाही.हे पण तेवढेच खरे आहे.यातून ज्यांना ज्यांना लोकशाही व संविधानाचे रक्षण व्हावे असे वाटते त्यांनी पक्षीय भेद विसरून एकत्र येऊन लोकशाहीची होत असलेली गळचेपी थांबविण्यासाठी पूर्ण ताकदीने या लढ्यात सहभागी होण्याची गरज आहे.एवढेच या प्रसंगी नमूद करतो व माझा लांबत चाललेला हा लेखनप्रपंच इथेच थांबवतो..!!

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे उच्चांकी वीजमागणीत दिलासा

नांदेड/प्रतिनिधी-एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी झाल्याचा परिणाम म्हणून ऑक्टोबर महिन्यात अभूतपूर्व उष्णता जाणवत आहे. मुंबईसह राज्यात १० ऑक्टोबर रोजी आतापर्यंतची सर्वाधिक ३८,०२१ मेगावॅट विजेची मागणी नोंदविली गेली असून उच्चदाब वीज प्रणालीतून ३२,९२१ मेगावॅट आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या अंतर्गत सौर प्रकल्प व प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या माध्यमातून ५१०० मेगावॅट वीज उपलब्ध झाल्याने उच्चांकी वीज मागणी पूर्ण करण्यात आली. सौर ऊर्जा योजनांमुळे दिवसा वीज उपलब्ध होण्यासोबत वीजखरेदीतील बचतीचा लाभ होत आहे.

मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले की, दुष्काळी परिस्थितीत राज्यात उन्हाच्या झळा जाणवत आहेत. विजेची मागणी प्रचंड वाढली असताना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन सुरू केलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेचा मोठा लाभ झाला आहे. त्यासोबत प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून राज्यात छतांवर उभारलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पांचाही लाभ झाला आहे. या योजनांमुळे दिवसा वीज मागणी वाढलेली असताना विजेची उपलब्धता आणि वीज खरेदीतील मोठी बचत असा दुहेरी दिलासा मिळाला आहे.राज्यातील सर्व ४८ लाख कृषी पंप सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत एकूण १६,००० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. आतापर्यंत सात हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. सध्या या योजनेमुळे व काही तांत्रिक उपायांचा अवलंब करून ८० टक्के कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यात येत आहे.

# मुखेड येथे आरोग्य तपासणी शिबिर

मुखेड/प्रतिनिधी-क्षयरोग (टीबी), दमा, हृदयरोग आणि फुफ्फुसाच्या विविध आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सेवा व तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने मुखेड येथे रविवार दि.२५ ऑक्टोबर रोजी शहरातील बाऱ्हाळीनाका परिसरात विशेष वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांना मार्गदर्शन मिळणार असून शिबिरात श्वसनविकार, फुफ्फुसांचे आजार आणि हृदयविकारा संबंधी तपासणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच पल्मोनरी फंक्शन टेस्ट आणि फुफ्फुसांच्या कार्यक्षमतेशी संबंधित अन्य तपासण्याही केल्या जाणार आहेत. गरजू रुग्णांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ.श्रीहरी बुडगेमवार, पवन पोतदार, डॉ.अशोक कौरवार, डॉ.अविनाश पाळेकर आदींनी केले आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# ऊस उत्पादकांना प्रतिटन चार हजाराची उचल द्यावी;अन्यथा आंदोलन

अर्धापूर/प्रतिनिधी-ऊस उत्पादकांना पहिली उचल प्रतिटन ४ हजार रुपये द्यावी, दुष्काळी परिस्थितीचा विचार करुन डिसेंबरपूर्वी गाळप सुरु करु नये, ऊसाच्या वजनातील काटामारी व अनधिकृत कपाती थांबवाव्यात, या मागण्यांसाठी बालाजी गाडे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सभासद व शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना, येळेगाव येथे निवेदन दिले. मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

ऊसाच्या वजनात तफावत आढळल्यास चौकशी करावी, ऊसतोडणीनंतर १४ दिवसांच्या आत संपूर्ण बील शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावे तसेच ऊसतोड कामगारांच्या मजुरीत २५ टक्के वाढ करुन त्यांना जीवनवीमा संरक्षण द्यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी बाबूराव कपाटे, अशोक कपाटे, भुजंग पाटील शिंदे, बळवंत पुयड,सदाशिव कपाटे, वामन पाटील खानसोळे, चक्रधर खानसोळे, बालाजी शिंदे, बंडू पाटील खानसोळे, शिवाजी वडजे, माणिक मुंगल, केशव पाटील शिंदे, माधव खानसोळे, संग्राम देशमुख, संभाजी गाडे, विश्वनाथ जाधव, कैलास कपाटे, निरंजन खानसोळे, गोविंद कपाटे, हनुमान तिडके, मनोहर कुरे, उद्धव भालेराव, गोपीराज कळणे, विलास कळणे, विश्वनाथ कंकाळ, गजानन देशमुख, अच्युत मुंगल यांच्यासह इतर सभासद व शेतकरी उपस्थित होते.

# तरुण अल्पभूधारक शेतकऱ्याची आत्महत्या

नांदेड/प्रतिनिधी-हिमायतनगर तालुक्यातील आदिवासी बहुल पिंचोंडी येथे शेतकरी ज्ञानेश्वर केरबा कोळेकर (३५) यांनी २२ ऑक्टोबर रोजी रात्री गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना २३ ऑक्टोबर शुक्रवारी सकाळी उघडकीस आली.

ज्ञानेश्वर कोळेकर हे वडिलांच्या नावे असलेल्या शेतजमिनीत शेती करत होते. याशिवाय, इतरांची जमीन कसून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होते. मात्र, यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे शेतीच्या उत्पादनावर परिणाम झाला. पेरणीसाठी केलेला खर्च आणि त्या तुलनेत हाती आलेले कमी उत्पन्न यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची माहिती समोर आली आहे. शुक्रवारी सकाळी आत्महत्येची घटना उघडकीस आल्यानंतर ज्ञानेश्वर कोळेकर यांना हिमायतनगर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. ज्ञानेश्वर कोळेकर यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले आणि भाऊ असा परिवार आहे.

# दुष्काळामुळे रोजगारासाठी मजुरांची मोठ्या शहरांकडे धाव

मुखेड/प्रतिनिधी-यंदा पावसाने चक्क पाठ फिरविल्याने मराठवाड्यावर सर्वत्र दुष्काळाचे चित्र असून मजुरांच्या रोजगाराचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. अशा स्थितीत मुखेड तालुक्यातील मजूर रोजगाराच्या शोधासाठी मुंबई,पुणे यासारख्या मोठ्या शहरांकडे धाव घेत असल्याचे पहावयास मिळत आहे.

मुखेड तालुक्यासह ग्रामीण भागात दुष्काळी परिस्थितीमुळे शेती व्यवसाय अडचणीत आला असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर परिणाम जाणवू लागले आहेत. पावसाच्या अनियमिततेमुळे आणि पिकांच्या उत्पादनाबाबत निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. दुसरीकडे, शेतीवर मजुरी करुन उदरनिर्वाह करणाऱ्या शेतमजुरांच्या हातालाही पुरेसे काम मिळत नसल्याने अनेक कुटुंबांसमोर रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी, पोटाची खळगी भरण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिक पुणे, मुंबई तसेच इतर मोठ्या शहरांकडे स्थलांतर करण्याचा मार्ग स्वीकारत आहेत. ग्रामीण भागातील बहुतांश कुटुंबांचा उदरनिर्वाह शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे. मात्र, दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांचे उत्पादन घटण्याची भीती, वाढता शेतीखर्च आणि शेतीमालाला अपेक्षित दर मिळण्याबाबतची अनिश्चितता यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. पेरणीपासून ते पीक काढणीपर्यंत केलेला खर्च भरुन निघेल की नाही, याबाबत शेतकऱ्यांच्या मनात प्रश्न निर्माण झाले आहेत. शेतीतील उत्पन्न कमी झाल्यास त्याचा थेट परिणाम ग्रामीण बाजारपेठेवर होतो. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने खरेदी-विक्रीचे व्यवहार मंदावतात. याचा फटका छोट्या व्यावसायिकांनाही बसतो.

# ध्येय निश्चित करा,सातत्यपूर्ण परिश्रमातून यश मिळवा!-जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी-विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यातील ध्येयांचे स्पष्ट निर्धारण करून सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्त, स्व-अभ्यास आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या बळावर यश संपादन करावे. केवळ नोकरी मिळविण्यापुरते मर्यादित न राहता समाजपरिवर्तनात सक्रिय योगदान देणारे जबाबदार नागरिक म्हणून स्वतःला घडवावे, असे मार्गदर्शन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या १२० तासांच्या प्रत्यक्ष कार्यानुभव प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने सार्वजनिक प्रशासन व राज्यशास्त्र विषयाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांशी जिल्हाधिकारी कर्डिले यांनी संवाद साधला. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यातील ध्येय-आकांक्षा जाणून घेत त्यांच्या करिअरविषयक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी भविष्यात कोणत्या क्षेत्रात करिअर घडवायचे आहे, त्यासाठी कोणती तयारी सुरू आहे आणि उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणती कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे, याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी मुक्तपणे संवाद साधला. विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवा, राजकारण, कायदा, अध्यापन, संशोधन, सामाजिक विकास आणि विविध स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून समाजसेवा करण्याची इच्छा व्यक्त केली. यावेळी ध्येय निश्चिती, वेळेचे प्रभावी व्यवस्थापन, नियमित वाचन, संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. आपल्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी सातत्य, शिस्त आणि स्व-अभ्यासाला पर्याय नसल्याचेही त्यांनी नमूद केले. संवादादरम्यान विद्यार्थ्यांनी प्रशासकीय कामकाज, शासकीय योजना, सार्वजनिक धोरणे, स्पर्धा परीक्षांची तयारी, करिअर विकास आणि लोकाभिमुख प्रशासन यांसंबंधी विविध प्रश्न विचारले. जिल्हाधिकारी कर्डिले यांनी या प्रश्नांना उत्तरे देत प्रशासनाची कार्यपद्धती, लोकसेवेतील संधी आणि जबाबदाऱ्या यांची माहिती दिली.

# बंदी घातलेल्या संघटनेशी संबंध; काश्मीरमध्ये ४ महिलांसह ६ जणांना अटक

नवी दिल्ली:जम्मू आणि काश्मीरच्या बांदीपोरा जिल्ह्यात बंदी घातलेल्या 'इत्तेहाद-उल-मुस्लिमीन' या संघटनेशी संबंध असल्याच्या आरोपावरून सहा जणांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये चार महिलांचा समावेश आहे. या नेटवर्कला सीमेपलीकडून निधी मिळत असल्याचा पोलिसांना संशय आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, बांदीपोरा आणि आसपासच्या परिसरात १४ ते १५ गुप्त बैठका झाल्या होत्या. यापैकी पाच ते सहा बैठका बांदीपोरा-बारामुल्ला रस्त्यावरील एका छोट्या हॉटेलमध्ये झाल्या होत्या.

तपासकर्त्यांना एका वर्षापेक्षा जास्त कालावधीत अंदाजे ७ ते ८ लाख रुपयांचे संशयास्पद व्यवहार आढळून आले आहेत. बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायद्याच्या कलम १० आणि १३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निधीचा स्रोत आणि या नेटवर्कमध्ये सामील असलेल्यांच्या भूमिकेचा तपास करत आहेत.पोलिसांच्या माहितीनुसार, कुम्वारा जिल्ह्यातील हंदवारा येथील रहिवासी वाहिद अहमद भट यांच्यापासून तपासाला सुरुवात झाली. एका परिषदेनंतर त्याला २०२२ मध्ये यूएपीए प्रकरणात अटक करण्यात आली. पोलिसांच्या दाव्यानुसार, कुम्वारा तुरुंगात असताना, भटने मंजूर अहमद शाह यांच्याशी पुन्हा संपर्क साधला, जो कथितरित्या पाकिस्तानात होता. त्यानंतर, या कथित नेटवर्कने आपल्या विचारधारेचा प्रसार करण्यासाठी आणि पाठिंबा मिळवण्यासाठी सभा आयोजित केल्या. तपासकर्त्यांच्या मते, बांदीपोरा येथील दाचीगामची रहिवासी असलेल्या मुबिना बानोच्या जम्मू-काश्मीर बँक खात्यात अंदाजे छ२.२६ लाख जमा करण्यात आले होते. उर्वरित रक्कम कथितरित्या रोख स्वरूपात देण्यात आली होती. पोलिसांच्या दाव्यानुसार, यातील काही पैसे साथीदारांमध्ये वाटण्यात आले, तर काही पैसे भटच्या वैद्यकीय उपचारांसाठी वापरण्यात आले.

# नांदेडमध्ये 'अमृत पेठ थेट बाजारपेठ' दिवाळी मेळ्याचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-स्थानिक व्यावसायिक, लघुउद्योजक आणि महिला उद्योजकांना आपल्या उत्पादनांच्या प्रदर्शनासाठी व विक्रीसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने अमृत पेठ थेट बाजारपेठ या उपक्रमांतर्गत नांदेड येथे भव्य दिवाळी मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात MitrAAn Events Management यांचे सहकार्य लाभणार आहे.

हा मेळावा दि. २७, २८ व २९ ऑक्टोबर रोजी चैतन्यनगर येथील सौभद्र मंगल कार्यालय, नांदेड येथे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.या मेळ्याच्या माध्यमातून स्थानिक व्यावसायिक, लघुउद्योजक, महिला उद्योजक तसेच घरगुती व हस्तकला उत्पादनांची निर्मिती करणाऱ्यांना आपल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री करता येणार आहे. मेळ्यात कपडे, फॅशनविषयक वस्तू, दागिने, हस्तकला, घरगुती उत्पादने, खाद्यपदार्थ आणि अन्य विविध वस्तूंचे स्टॉल असणार आहेत. त्यामुळे नागरिकांनाही एकाच ठिकाणी विविध वस्तूंची खरेदी करण्याची संधी मिळणार आहे. स्थानिक उद्योजकांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या उत्पादनांची प्रसिद्धी करणे, ग्राहकांशी थेट संपर्क वाढविणे आणि व्यवसाय वृद्धीला चालना देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. मेळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्टॉलधारकाला अमृत संस्थेचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यामुळे व्यावसायिकांना आपल्या व्यवसायाची ओळख निर्माण करण्यास मदत होणार आहे. मेळ्याची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी समाज माध्यमे, डिजिटल जाहिराती आणि विविध प्रसिद्धी माध्यमांचा वापर करण्यात येणार आहे.

# श्री परमेश्वर मंदिरात रविवारी कोजागिरी पौर्णिमा उत्सव

हिमायतनगर/प्रतिनिधी-हिमायतनगर (वाढोणा) येथील जागृत देवस्थान श्री परमेश्वर मंदिरात रविवार, २५ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त प्रसिध्द गायक परमेश्वर तिप्पनवार यांच्या स्वर झंकार या भावभक्तिगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, रात्री ९ वा.भजन संध्या रंगणार आहे.

कोजागिरी पौर्णिमेच्या मंगलमय पर्वानिमित्त आयोजित या कार्यक्रमात गायक परमेश्वर तिप्पनवार यांच्या सुमधुर स्वरांतून भावभक्तिगीतांची मेजवानी भाविकांना अनुभवता येणार आहे. गायिका माधुरी जाधव या साथ देणार असून, तबला वादन सचिन बोंपिलवार, पखवाज वादन कृष्णा बोंपिलवार आणि ऑर्गनची साथ सुनील मांजरे देणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन प्रा.अंभोरे (वसमत) करणार आहेत. या उत्सवाला हिमायतनगर शहरासह तालुक्यातील आणि परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री परमेश्वराचे दर्शन घ्यावे, तसेच भजन संध्येचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री परमेश्वर मंदिर ट्रस्ट कमिटीचे उपाध्यक्ष महावीरचंद श्रीश्रीमाळ यांनी केले आहे.

# ब्राह्मणगावात विसर्जन मिरवणुकीत पोलिसांना अडथळा

## हुज्जत घालणाऱ्या १५ जणांवर गुन्हे दाखल

उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड तालुक्यातील ब्राह्मणगाव येथे शारदा देवी विसर्जन मिरवणुकी दरम्यान बंदोबस्तावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांशी वाद घालून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी १५ जणांविरुद्ध उमरखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.२२ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास ब्राह्मणगाव येथे शारदा देवी विसर्जन मिरवणूक सुरू होती. यावेळी उमरखेड पोलीस ठाण्याचे कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात होते. पोलिसांनी मिरवणुकीची वेळ आणि मार्ग याबाबत विचारणा केली असता, काही कार्यकर्त्यांनी आम्हाला तुमची गरज नाही, तुम्ही इथून निघून जा असे म्हणत वाद घालण्यास सुरुवात केली.फिर्यादीत म्हटले आहे की, यानंतर संबंधित कार्यकर्त्यांनी पोलीस कर्मचाऱ्यांच्या अंगावर धावूनजात शिवीगाळ व धक्काबुक्की केली आणि शासकीय कर्तव्यात अडथळा निर्माण केला. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक योगेश जाधव यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ठाणेदार शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुंडे पुढील तपास करीत आहेत.


## जाहीर प्रगटन

मा.श्री.ए.जी.चव्हाण, ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, नांदेड
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५९९/२०२६
अलताफ व इतर विरुद्ध निरंक

अर्जदार : १. अलताफ अहमद पि.शेख अहमद वय : ४९ वर्षे, धंदा : व्यवसाय, २. शेख मुकीत पि.शेख अहमद वय : ४४ वर्षे, धंदा : व्यवसाय, ३. शेख शफीक पि.शेख अहमद वय : ४० वर्षे, धंदा : व्यवसाय, सर्व रा.गल्ली क्र.१५, पीरबुऱ्हाननगर, नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदारांनी कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदार हे मयत सरवरी बेगम भ्र.शेख अहमद व शेख अहमद पि.अब्दुल कबीर यांचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र.१ ते ३ ही त्यांची अपत्ये आहेत. त्यांचा मृत्यू अनुक्रमे दिनांक ०९/१०/२०१८ व २४/१०/२०२३ रोजी नांदेड येथे झाला, त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र नांदेड महानगरपालिकेने निर्गमित केले असून त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तुत संचिकेत दाखल करण्यात आलेल्या आहेत. अर्जदारांच्या अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारस नाही, असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदारास शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयीन कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयत **सरवरी बेगम भ्र.शेख अहमद व शेख अहमद पि.अब्दुल कबीर** यांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात **दिनांक २६/११/२०२६** पर्यंत किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत हजर राहून आक्षेप नोंदवावा/सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन आज दिनांक १६/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

| स्वाक्षरित/- | आदेशावरुन स्वाक्षरित/- |
|---|---|
| **कनिष्ठ लिपीक** | **सहायक अधिक्षक** |
| ६ वे सह दिवाणी न्यायालय क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |


# मुखेड आय.एम.ए.ला राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट शाखेचा पुरस्कार जाहीर

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड आय.एम.ए.च्या सामाजिक, संघटनात्मक, शैक्षणिक व आपत्कालीन कामाची दखल घेऊन महाराष्ट्र आय. एम. ए. च्या वतीने सर्वोत्कृष्ट शाखेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार नागपूर इथे होणाऱ्या परिषदेत १४ नोव्हेंबर रोजी वितरित करण्यात येणार आहे. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे सर्व स्तरांतून याचे कौतुक होत आहे.

मुखेड आय.एम.ए. नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असते. मागील काळात मुखेड आय.एम. ए. कडून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. पुरग्रस्ताना मदत म्हणून पूरग्रस्त गावांना भेटी देऊन वैद्यकीय उपचार व मोफत औषध सोबत इतरही मदत, महिला दीनानिमित्या कामगार महिलांचं सन्मान, अवयव दान ही काळाची गरज असल्याचं त्यांनी अवयव दाते व प्राप्तकर्ते यांचा सन्मान सोहळा घेऊन जनजागृती केली. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियाना आर्थिक मदत व मोफत आरोग्य सेवा,राष्ट्रीय आपत्ती मधे आर्थिक योगदान वृक्षारोपण, जलसेवा,गरजूंना थंडीच्या दिवसात ब्लँकेटचे वाटप यासारख्या विविध उपक्रमात आय एम ए नेहमीच अग्रेसर राहिली आहे.


CHANGE IN NAME

My (old name) is **SYED NAJIYABEGAM SHOUKATALI** which now I am, changing as (new name) **SYED NAJIYABEGUM SHOUKATALI**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Address
Kundalwadi Biloli Nanded-431711
M.No.-9421759086

CHANGE IN NAME

My (old name) is **SHAIKH ZAFAR SHAIKH AHMED** which now I am, changing as (new name) **SHAIKH ZAFAR SHAIKH AHMAD**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Address
9-5-1241,Hilal Nagar,Degloor Naka, Nanded-431604
M. No.-9890412183

CHANGE IN NAME

My (old name) is **SAYAD FAYAJALI** which now I am, changing as (new name) **SYED FAYYAZ ALI**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Address
887,Chaitanya Nagar Taroda Bk, Nanded-431605
M. No.-9421759086

CHANGE IN NAME

My (old name) is **MOHD ABUZAID MOHD NIZAM** which now I am, changing as (new name) **MOHAMMED ABU ZAID**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Address
Kundalwadi Biloli Nanded-431711
M. No.-9421759086


# 'प्रश्नगर्भ'मधून समाजविकासाची परंपरा कायम-देवीदास फुलारी

नांदेड/प्रतिनिधी-ज्या कवीला समाज विकाससाठी नित्य प्रश्न पडतात तोच खरा सृजनशील कवी होय. या प्रश्नांमधूनच समाजाचा विकास साधला जातो. ही समाज विकासांची परंपरा कवी राजाराम बनसकर यांच्या 'प्रश्नगर्भ' या कवितासंग्रहातून कायम राहिली आहे असे प्रतिपादन अ.भा. मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य देवीदास फुलारी यांनी केले आहे.

कळमनुरी येथील महात्मा फुले विद्यालयात प्रा.राजाराम बनसकर लिखित 'प्रश्नगर्भ' या कवितासंग्रहाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्रारंभी म.फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. मान्यवरांचे स्वागत या विद्यालयाचे अध्यक्ष विधिज्ञ अशोक सावंत यांनी केले. प्रास्ताविक प्रकाशक दत्ता डांगे यांनी केले. यानंतर 'प्रश्नगर्भ' या कवितासंग्रहाचे प्रकाशन सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कवी राजाराम बनसकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना विजय गं.वाकडे म्हणाले की, बनसकर यांची कविता ही संवेदनशील कविता होय.अशी भावकविता महत्वाची असते. अशा कवितेत कवीच्या हृदयाची स्पंदने असतात. प्रा.अशोक अर्धापूरकर यांनी म्हटले की, अल्पाक्षरी कविता हे बनसकर यांचे वैशिष्ट्य होय.

# सह सरकार्यवाह यांच्या उपस्थितीत उद्या संघाचा विजयादशमी उत्सव

नांदेड/प्रतिनिधी-इ.स.१९२५ च्या विजयादशमीला स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटनेस शंभर वर्षे पूर्ण झाली असून या विजयादशमीस संघाचे शताब्दी वर्ष पूर्ण झाले आहे. यानिमित्त देशभरात रा.स्व.संघाद्वारे विविध कार्यक्रम व अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षी देखील विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सव साजरा करण्यात येत असून नांदेड येथे यशवंत महाविद्यालयाच्या प्रांगणात अखिल भारतीय सह सरकार्यवाह आलोक कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत विजयादशमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.४५ वाजता यशवंत महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आला असून या उत्सवात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहावे, असे आवाहन शहर संघचालक डॉ.गोपाल राठी यांनी केले आहे.

# नवरात्र संपली,तरी धानोडा पुलावरील वाहतूक बंदच

## जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनांना टोपली;दिवाळीच्या गर्दीत प्रवाशांच्या जीवाला धोका

माहूर/प्रतिनिधी-नवरात्रोत्सव संपला, तरी धानोडा येथील पैनगंगा नदीवरील नवीन पुलावरून वाहतूक सुरू झालेली नाही. नवरात्रोत्सवाच्या नियोजन बैठकीत माहूर शहरातील पथदिवे सुरू करणे, धानोडा येथील नवीन पुलावरून वाहतूक सुरू करणे तसेच पुलाच्या फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागाला सक्त सूचना दिल्या होत्या. मात्र, संबंधित विभागाने केवळ माहूर शहरातील पथदिवे सुरू करून इतर महत्त्वाच्या कामांकडे साफ दुर्लक्ष केले आहे.



त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनांचे पालन करण्याबाबत संबंधित विभागाची उदासीनता पुन्हा एकदा समोर आली आहे.

धानोडा येथील पैनगंगा नदीवरील नवीन पुलाचे काम पूर्ण होऊनही त्यावरून वाहतूक सुरू करण्यात आलेली नाही. या पुलावरून वाहतूक सुरू करण्यासह आवश्यक सुविधांची पूर्तता करण्याच्या मागणीसाठी गत महिन्यात पत्रकारांनी उपोषणही केले होते. मात्र, या आंदोलनानंतरही संबंधित विभागाला जाग आलेली नसल्याचे चित्र आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नवरात्र नियोजन बैठकीत स्पष्ट सूचना देऊनही पुलावरील वाहतूक सुरू करण्याचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे.आता दिवाळीच्या सुट्ट्या सुरू होणार असून, या काळात माहूर गडावरील श्री रेणुकादेवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळणार आहे. नवरात्रोत्सवाप्रमाणेच दिवाळीच्या सुट्ट्यांमध्येही भाविकांची संख्या हजारोंवरून लाखोंच्या घरात पोहोचण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत धानोडा येथील जीर्ण व कमकुवत जुन्या पुलावरून वाहतूक सुरू ठेवणे म्हणजे वाहनधारकांच्या जीवाशी खेळ करण्यासारखे असल्याची भावना प्रवासी आणि नागरिक व्यक्त करीत आहेत.नवीन पुलावरून वाहतूक सुरू झाल्यास जुन्या पुलावरील वाहतुकीचा ताण कमी होऊन भाविक आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळू शकतो. मात्र, संबंधित विभागाच्या दिरंगाईमुळे हा प्रश्न अद्याप कायम आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही केवळ पथदिवे सुरू करून उर्वरित कामांना बगल देण्यात आली असेल, तर याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल उपस्थित होत आहे. दिवाळीच्या गर्दीपूर्वी नवीन पुलावरून वाहतूक सुरू करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून होत आहे. अन्यथा, एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवालही उपस्थित केला जात आहे.

## भाजपचे सगळे नगरसेवक शिंदेंच्या बंगल्यावर

ठाणे:अंबरनाथमध्ये वातावरण कमालीचे तापले आहे. अंबरनाथच्या नगराध्यक्ष तेजस्वी कर्जुले यांच्यासह भाजपचे सर्व नगरसेवक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ठाण्यातील निवासस्थानी दाखल झाले आहेत. या अचानक झालेल्या भेटीमुळे अंबरनाथच्या स्थानिक राजकारणात मोठ्या राजकीय उलटफेरांच्या आणि सत्ता बदलाच्या चर्चांना उधाण आले आहे.अंबरनाथ नगरपालिकेत सध्या भाजपचा नगराध्यक्ष असला, तरी नगरसेवकांच्या संख्याबळाच्या बाबतीत शिवसेना (शिंदे गट) हा सर्वात मोठा पक्ष आहे. गेल्या काही दिवसांपासून अंबरनाथमध्ये स्थानिक पातळीवर भाजप आणि शिवसेना यांच्यात अंतर्गत मतभेद सुरू असल्याच्या चर्चा होत्या.

# आम्हाला कारवाईपासून रोखलं जातंय,अधिकार हिरावले जातायत;एफडीएची आरोग्य मंत्रालयाविरोधात कोर्टात धाव

पुणे:एफडीएने केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (एफएसएसएआय) विरोधात थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्यापासून रोखले जात असल्याचा आणि अधिकार हिरावून घेतले जात असल्याचा एफडीएने दावा केला आहे. एफएसएसएआयने घटनाबाह्य पद्धतीने समांतर अंमलबजावणी यंत्रणा निर्माण केली असून, त्याद्वारे राज्य सरकारच्या अधिकारांवर अतिक्रमण केल्याचा एफडीएचा दावा आहे. एफएसएसएआयच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी आणि केंद्रीय परवाना प्राधिकरण यांसारखी पदे निर्माण करून आपल्या अधिकारांचा बेकायदेशीरपणे वापर केल्याचा याचिकेत म्हटले असून ही पदे अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याच्या वैधानिक चौकटीत बसत नसल्याचा एफडीएचा दावा आहे.

अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चा उद्देश अन्न नियमनाचे विकेंद्रीकरण करणे हा होता, असा दावा देखील एफडीएकडून याचिकेत करण्यात आला आहे. यापूर्वी या कायद्याची अंमलबजावणी राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त आणि नियुक्त अधिकारी यांच्यामार्फत केली जात होती असंही एफडीएने म्हटलं आहे. मात्र, त्यानंतर केंद्र सरकार आणि एफएसएसएआय यांनी कायद्यात विविध सुधारणा केल्या. या सुधारणांमुळे विकेंद्रित अंमलबजावणी व्यवस्था हळूहळू मोडीत काढली जात असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.घटनाबाह्य सुधारणा आणि नियम रद्द करण्याची तसेच, केंद्रीय परवाना असलेल्या आस्थापनांची तपासणी करण्यापासून राज्याच्या अधिकाऱ्यांना रोखणाऱ्या मे २०२३ मधील आदेशाला स्थगिती देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. २६ नोव्हेंबरला मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडणार आहे. ५० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक वार्षिक उलाढाल असलेले व्यवसाय एफएसएसएआयच्या केंद्रीय परवाना प्राधिकरणाच्या अखत्यारीत येतात. मोठ्या अन्न व्यवसायांची किंवा तीन तारांकित हॉटेल्सची तपासणी करायची असल्यास राज्याच्या एफडीएला प्रत्येक वेळी एफएसएसएआयची लेखी परवानगी घ्यावी लागते.खाद्य सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने (एफएसएसएआय) असंवैधानिकपणे एक समांतर अंमलबजावणी प्रणाली स्थापन करून राज्य सरकारच्या अधिकारांवर गदा आणल्याचा दावा करत, महाराष्ट्र सरकारने अन्न सुरक्षेच्या अनेक नियमांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. राज्याच्या अन्न सुरक्षा आयुक्तांमार्फत दाखल करण्यात आलेल्या या याचिकेत म्हटले आहे की, अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चा मुख्य उद्देश अन्न वितरणाचे नियमन विकेंद्रित करणे हा होता.

## ‘इंडिया’ आघाडीची १ नोव्हेंबरला महारॅली

नवी दिल्ली:दिल्लीच्या रामलीला मैदानावर १ नोव्हेंबर रोजी विरोधी पक्षांची एक मोठी रॅली होणार आहे. अखिल भारतीय आघाडीतील सर्व पक्षांचे नेते यात सहभागी होणार आहेत. या रॅलीला भव्य स्वरूप देण्यासाठी काँग्रेस नेत्यांसोबत सातत्याने बैठका घेत आहे. दिल्लीजवळील राज्यांमधून गर्दी जमवण्यासाठी एक रणनीती तयार करण्यात आली आहे.

दिल्ली व्यतिरिक्त, हरियाणा, उत्तर प्रदेश, राजस्थान, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि पंजाबमधील नेत्यांना गर्दी जमवण्याचे काम सोपवण्यात आले आहे. नेत्यांना १ नोव्हेंबर रोजी रामलीला मैदानावर ५ लाख लोकांची गर्दी जमवण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे, या निर्णयावर भाजपने टीका केली आहे.हरियाणा काँग्रेसला रॅलीसाठी १ लाख लोक जमवण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे. उत्तर प्रदेशसह इतर राज्यांना प्रत्येकी ५०,००० लोक जमवण्यास सांगितले आहे.

## दुष्काळाच्या संकटात जलसंवर्धन काळाची गरज-आ.श्रीजया चव्हाण



नांदेड/प्रतिनिधी-यंदा महाराष्ट्र दुष्काळाच्या संकटाला सामोरा जात आहे. अशा परिस्थितीत प्रत्येकाने पाण्याचा वापर जपून व काटकसरीने करणे आवश्यक आहे. कै. शंकरराव चव्हाण साहेबांच्या दूरदृष्टीमुळे आणि जायकवाडी धरणासारख्या जलप्रकल्पांमुळे तहानलेल्या मराठवाड्याला मोठा आधार मिळाला आहे, असे गौरवोद्गार आ.ॲड. श्रीजया अशोकराव चव्हाण यांनी पिंपळगाव महादेव येथे काढले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक सेवेतील २५ वर्षांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी देशभरात सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नांदेड येथील जयप्रकाश ग्रामकल्याण संस्था संचलित निर्धार व्यसनमुक्ती केंद्राच्या वतीने पिंपळगाव महादेव येथील शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना आ.ॲड. श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सुभाषराव कल्याणकर होते. प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष राम अय्यर यांनी व्यसनमुक्ती केंद्राच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळातील विविध उपक्रमांचा आढावा घेतला.यावेळी आ.श्रीजया चव्हाण यांनी निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या कु. राजनंदिनी दुधमल आणि महेश व्यंकटी कल्याणकर यांचे विशेष कौतुक केले.

# मुदखेडच्या कंत्राटी अभियंत्याच्या मालमत्तेची चौकशी रखडली

## माजी नगराध्यक्ष राम चौधरींनी दिला उपोषणाचा इशारा

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड नगरपालिकेत कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असलेल्या एका अभियंत्याच्या कथित बेहिशेबी मालमत्तेची चौकशी करण्यासाठी पुराव्यांसह तक्रार दाखल करूनही वर्षभरापासून कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप मुदखेडचे माजी नगराध्यक्ष राम चौधरी यांनी केला आहे. संबंधित प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास येत्या १० नोव्हेंबर २०२६ पासून नांदेड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयासमोर समर्थकांसह आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा त्यांनी



निवेदनाद्वारे दिला आहे.

राम चौधरी यांनी निवेदनात नमूद केले आहे की, संबंधित कर्मचाऱ्याच्या मालमत्तेबाबत पुराव्यांसह तक्रार करून एक वर्षाचा कालावधी उलटला आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या प्रकरणाचा तपास नेमका कोणत्या टप्प्यावर आहे, याची माहिती घेण्यासाठी त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेतली. त्यावेळी केवळ चौकशी सुरू असल्याचे तोंडी सांगण्यात आले. आपण तक्रारदार असल्याने प्रकरणाच्या सद्यस्थितीची माहिती मिळणे हा आपला कायदेशीर अधिकार असल्याचे चौधरी यांनी म्हटले आहे.संबंधित प्रकरणात जबाब देऊन तीन महिने उलटले, तरी तपासाबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. तसेच गेल्या तीन महिन्यांपासून विभागातील कोणत्याही अधिकाऱ्याने आपल्याशी संपर्क साधलेला नाही, अशी तक्रारही त्यांनी केली आहे. कार्यालयीन प्रक्रियेच्या नावाखाली आणि काही राजकीय व्यक्तींच्या सांगण्यावरून तपासाला जाणीवपूर्वक विलंब केला जात असल्याचा संशय त्यांनी निवेदनातून व्यक्त केला आहे. आपण ८१ वर्षांचे ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते असून, कोणत्याही वैयक्तिक द्वेषातून ही तक्रार केलेली नाही, असे चौधरी यांनी स्पष्ट केले. संबंधित कर्मचाऱ्याने जनतेच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपहार केल्याचा आरोप त्यांनी केला असून, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. संबंधित प्रकरणात येत्या एका महिन्यात प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करून संबंधित व्यक्तीविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करावी, तसेच कथित बेहिशेबी मालमत्तेबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी चौधरी यांनी केली आहे. अन्यथा, १० नोव्हेंबर पासून नांदेड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालया समोर आपल्या समर्थकांसह आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.आपले वय ८१ वर्षे असून रक्तदाब आणि मधुमेहाचा त्रास असल्याचे नमूद करत, उपोषणा दरम्यान आपल्या जीवितास काही बरे-वाईट झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहील, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

# सुबोध काकाणी यांची ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स’च्या गव्हर्निंग काउन्सिलवर निवड

धर्माबाद/प्रतिनिधी-राज्यातील व्यापार, उद्योग, कृषी आणि सेवा क्षेत्रातील सर्वोच्च शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ग्रीकल्चर च्या गव्हर्निंग काउन्सिल प्रशासकीय परिषदेवर धर्माबादचे प्रसिद्ध उद्योजक सुबोध काकाणी यांची निमंत्रित सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या उद्योग क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



संस्थेच्या वर्ष २०२६ ते २०२८ या आगामी दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी नुकतीच निवडणूक प्रक्रिया पार पडली. या नव्या कार्यकारिणी मंडळाचा कार्यकाळ संस्थेच्या वाटचालीत अत्यंत ऐतिहासिक मानला जात आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ही राज्यातील व्यापार आणि कृषी क्षेत्राला दिशा देणारी आघाडीची संस्था आहे. आगामी २०२६-२०२८ हा कार्यकाळ संस्थेचे शतक महोत्सवी वर्ष म्हणून साजरा केला जाणार आहे. एका गौरवशाली आणि ऐतिहासिक पर्वात काम करण्याची संधी सुबोध काकाणी यांना मिळाल्याने या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सुबोध काकाणी यांची प्रशासकीय परिषदेवर निमंत्रित सदस्य म्हणून निवड झाल्याची घोषणा होताच, धर्माबाद व नांदेड जिल्ह्यातील व्यापारी, कृषी व्यावसायिक आणि विविध सामाजिक क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे मोठ्या प्रमाणावर स्वागत करण्यात येत आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा राज्यातील आणि विशेषतः मराठवाड्यातील व्यापार-उद्योगाला गती देण्यासाठी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पान १ वरुन

### टायगर श्रॉफवरील...

दल स्थापन करावे, अशा प्रमुख मागण्या पत्रातून करण्यात आल्या आहेत. गोळीबारातील आरोपींवर कठोर कारवाई करून खटला जलदगती न्यायालयात चालवावा आणि सरकारने केलेल्या कारवाईचा कालबद्ध अहवाल सादर करावा, अशी मागणीही संघटनेने केली आहे. या मागण्यांवर केंद्र सरकार काय भूमिका घेते, याकडे चित्रपटसृष्टीचे लक्ष लागले आहे.

### मराठवाडा,विदर्भासह राज्यात...

आहे.त्यामुळे पावसाच्या शक्यतेकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले असून, पुढील हवामान अंदाज महत्त्वाचे ठरणार आहेत. दरम्यान, हवामान विभागाच्या अधिकृत सूचनांनुसारच पावसाचा अंदाज आणि संभाव्य परिणामांचा निष्कर्ष काढणे आवश्यक आहे.

### सागवान तस्करीचा...

मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत फिरत्या पथकाचे वनपरिक्षेत्र अधिकारी एन.एम.केंद्रे, वनपाल वाय.एस.बोखारे, एस.एम.यादव, वनरक्षक रवी दांडेगावकर, ओम शिंदे, बालाजी भुरके, चांगुणा बुरकुले, वनमजूर भाऊसिंग जाधव आणि वाहन चालक बाळकृष्ण आवले यांनी सहभाग घेतला.

### राजकीय हाणामारीत १८ तासांनंतरही...

कोचिंग क्लासेस, शाळा-महाविद्यालयाची लक्षणीय संख्या वाढल्याने भरमसाठ वस्तीवाढ आणि विद्यार्थी संख्येतसुद्धा अभूतपूर्व वाढ होणे स्वाभाविक आहे. अशावेळी अशा अप्रीय घटनेत वाढ होताना दिसते. म्हणून पोलीस बल वाढवून गोकुंद्यात कायम पोलीस बंदोबस्त ठेवण्यात यावा यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांच्याशी चर्चा केली. त्यांनी समाधानकारक बोलून समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. ग्रामपंचायतीने ठराव दिल्यास कायम बंदोबस्तासाठी पोलीस तैनात करण्यात येणार असल्याचे सांगितले.

## रंगनाथ राठोड यांची शिक्षक रत्न पुरस्कारासाठी निवड

नांदेड/प्रतिनिधी-प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे रंगनाथ तुकाराम राठोड यांची महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कारासाठी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीमुळे शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.रंगनाथ राठोड यांनी आपल्या सेवाकाळात विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून अध्यापनासोबतच शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न केले. सन २००८ मध्ये त्यांच्या प्रयत्नांतून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, झरी या शाळेने अभियानात संपूर्ण महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळविला.

पान १ वरुन

### नांदेडात शेतकऱ्याची...

समोर आलेला नाही. त्यामुळे आत्महत्या, आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा संशय किंवा अन्य कोणती शक्यता आहे, हे पोलीस तपासातूनच स्पष्ट होणार आहे. कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्यापूर्वी संबंधित सर्व बाबींची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाचा पंचनामा करून तो शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला. मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट करण्यासाठी शवविच्छेदन अहवाल महत्त्वाचा ठरणार आहे. फायनान्स कँमनीच्या कार्यालयात घडलेल्या या घटनेची पार्श्वभूमी, शेतकऱ्याला कार्यालयात आणण्यामागील कारणे आणि त्या काळातील घटनाक्रम यांचा तपास पोलीस करीत आहेत. शेतीतील अनिश्चितता, आर्थिक अडचणी आणि कर्जाचे ओझे यामुळे शेतकरी आधीच संकटात सापडलेले असताना कर्जवसुलीच्या पद्धतीवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कर्जाची वसुली करताना कायदेशीर प्रक्रिया आणि कर्जदाराच्या सन्मानाचे पालन केले जाते का, याची तपासणी होणे आवश्यक आहे.चंद्रकांत शिंदे यांच्या मृत्यूची निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणावे आणि या प्रकरणात कोणाचीही चूक आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. या घटनेमुळे एका शेतकऱ्याचा मृत्यू नेमका कसा झाला, याचे उत्तर शोधण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४